ePaper

**अमित शहांचे काँग्रेसकडे बोट; 'मणिपूर हिंसाचाराचा निषेध!**



| वर्ष - 7 । अंक - 99 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | गुरुवार , दिनांक 10 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- 'ही' तारीख लक्षात ठेवलीच पाहिजे
- रजनीकांत यांचा जेलर हाउसफुल
- राज्यातील हिंसाचार लज्जास्पद
- अदाणींसाठी मणिपूरमध्ये हिंसाचार


# तहसील कार्यालयावर आंदोलन!

## » कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने निदर्शने

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कामगार कर्मचारी संघटना संयुक्त कृती समितीच्या वतीने तहसिल कार्यालयावर निर्दशने करत केंद्र सरकारचा निषेध करण्यात आला.या मध्ये कैलास कदम, अजित अभ्यंकर, दिलीप पवार, अनिल रोहम, काशिनाथ नखाते, धनाजी येळकर, प्रा. सतीश काळे, मानव कांबळे, किशोर ढोकळे, रघुनाथ कुचिक, मारुती भापकर, शशिकांत धुमाळ, शब्बीर इनामदार, प्रविण कदम, भारती घाग, सीता तामचिकर आदींसह कामगार प्रतिनिधी यामध्ये सहभागी होते.**

या आंदोलनात पुणे, पिंपरी-चिंचवड मधील विविध संघटनांचे पदाधिकारी, कामगारांनी सहभाग घेतला. या आंदोलनात कामगारांनी पुढील मागण्या केल्या की, यामध्ये पुणे-तळेगावमधील जनरल मोटर्सची आस्थापना बंद करण्यास परवानगी देण्याचा निर्णय रद्द करून सर्व कामगारांना त्या काळाचा पूर्ण पगार द्या. कंपनीच्या हस्तांतरणामध्ये कामगार कर्मचाऱ्यांना विनाखंड सेवेची पूर्ण सुरक्षा द्या. उद्योग बंद करण्यास परवानगी देणारे कामगार मंत्री सुरेश खाडे आणि कामगार खात्याचे सचिव सिंघल यांचा राजीनामा घ्या.

मणिपूर, हरियाणा येथील हिंसक दंगलींना आळा घाला. कामगारविरोधी नवे कामगार कायदे रद्द करा. कंत्राटी प्रथा बंद करून कंत्राटी कामगारांना सेवेत कायम करा. सार्वजनिक क्षेत्रातील खासगीकरण बंद करा. किमान वेतन दरमहा रूपये 26 हजार करा. कामगार कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी यंत्रणेला पूर्ण आणि पुरेसे सक्षम करा.




घर कामगार, बांधकाम कामगार आदी सर्व असंघटितांना सामाजिक सुरक्षा आणि पेन्शन देणारा कायदा व तरतूद करा. अंगणवाडी-आशा अशा योजना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व दर्जा द्या, आदी मागण्या करण्यात आल्या.

# शिवसैनिकांनो, पेटती मशाल पुन्हा हाती घ्या!: दिलीप घोडेकर

## » पक्षाची विस्कटलेली घडी एकत्र करण्यासाठी सज्ज व्हा!

। पुणे । महाईन्यूज ।

**काही जणांनी फितूरी करत शिवसेना फोडली आहे. शिवसैनिकांनो पेटती मशाल पुन्हा हाती घ्या आणि पक्षाची विस्कटलेली घडी एकत्र करण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे चिंचवड विधानसभा संपर्कप्रमुख दिलीप घोडेकर यांनी शिवसैनिकांना केले आहे..**



आगामी महापालिका आणि लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटाकडून चिंचवड विधानसभा मतदारसंघातील प्रभाग, शाखानिहाय बैठका सुरू केल्या आहेत. त्याला उत्फूर्त प्रतिसाद मिळत असून या बैठकीत मार्गदर्शन करताना घोडेकर बोलत होते. मंगळवारी (दि. 8) रोजी चिंचवड विधानसभेतील प्रभाग क्रमांक 16, 17, 18, 22, 25, 27 परिसरातील वाल्हेकरवाडी, गुरुद्वारा, किवळे, मामुर्डी, रावेत, चिंचवड गावठाण, पुनावळे, रहाटणी, काळेवाडी, ज्योतिबानगर, तापकीरनगर, विजयनगर, पवनानगर, आदर्शनगर नढेनगर, विजयनगर, कोकणेनगर, ज्योतिबानगर, येथे चिंचवड विधानसभा संपर्कप्रमुख दिलीप घोडेकर यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग आणि शाखानिहाय भेटीगाठी तसेच बैठका पार पडल्या. उपजिल्हाप्रमुख हाजी दस्तगीर मनीयार, शहर संघटीका अनिता तुतारे, शहर निवडणूक प्रभारी अशोक वाळके, शहर समन्वयक कैलास नेवासकर, चिंचवड

## » शिवसेना ठाकरे गटाच्या चिंचवड मतदारसंघात प्रभाग, शाखानिहाय बैठका

विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे, शहर संघटक संतोष सौंदणकर आदीसह शिवसैनिक उपस्थित होते.

शहर संघटक संतोष सौंदणकर म्हणाले की, शिवसेना स्थापनेपासूनच जातीपातींपासून दूर राहिली आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेंनी कुठल्याही जातीबद्दल आप-परभाव बाळगला नव्हता. म्हणून उपेक्षित जातींमधून शिवसेनेने लोकांना स्थानिक स्वराज्य संस्था ते विधीमंडळापर्यंत प्रतिनिधित्व दिले. तोच न्याय यापुढेही कायम राहील. शिवसेना हा पक्ष निष्ठावंत शिवसैनिकांच्या सदैव पाठीशी राहतो.

# ज्येष्ठ विचारवंत हरी नरके यांच्या पार्थिवावर पुण्यात अंत्यसंस्कार!

## भुजबळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मंडळींनी घेतले अंत्यदर्शन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्री बाई फुले यांच्याविषयी समग्र लिखाण करणारे, ज्येष्ठ विचारवंत, संशोधक आणि समता परिषदेचे उपाध्यक्ष प्रा. हरी नरके यांचे आज मुंबईत हृदयविकाराचा झटका आल्याने वयाच्या ६०व्या वर्षी निधन झाले.**



तर साहित्यिक हरी नरके यांचे पार्थिव पुण्यातील वैकुंठ स्मशानभूमीत सायंकाळी ७ वाजता अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आल्यानंतर त्यांच्यावर ८ वाजून ५८ मिनिटांनी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ हे देखील उपस्थित आहेत. यावेळी छगन भुजबळ यांनी हरी नरके यांच्या पत्नी संगिता नरके, कन्या कु.प्रमिती नरके, भाऊ लक्ष्मण नरके, ईश्वर नरके, दत्तात्रय नरके, सुदाम नरके आणि पुतणे विष्णू नरके यांच सांत्वन केले. यावेळी आमदार कपिल पाटील, माजी खासदार समीर भुजबळ,माजी आमदार उल्हास पवार,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.सुरेश गोसावी, ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी छगन भुजबळ म्हणाले की, "हरी नरके हे समाजासाठी वैचारिक आधारस्तंभ होते. त्यांनी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कर्तृत्व, इतिहास अतिशय बारकाईने अभ्यास करुन समाजासमोर आणले." पुढे भुजबळ म्हणाले की, "सावित्री बाई फुले यांचे जन्मगाव असलेले नायगाव येथे त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीनुसार तत्कालिन दिसणाऱ्या घराची राज्य शासनाने बांधणी केली आहे. त्यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथाचे आज हिंदी, इंग्रजी भाषेत अनुवाद झाले आहेत. देश विदेशात त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण त्यांनी भाषणे केली. त्यांच्या निधनाने महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना मानणाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे," अशा शब्दात त्यांनी श्रद्धांजली वाहिली. छगन भुजबळ पुढे म्हणाले की, "हरी नरके हे भोपाळ येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते. त्यावेळी तेथील डॉक्टरांनी त्यांच वजन वाढल्याचे सांगितले. शरीरामध्ये पाणी वाढले आहे आणि ते काढावे लागेल असे सांगितले. त्यानंतर त्यांचे पुढील २० दिवसात २० किलो वजन कमी झाले. त्या उपचारानंतर हरी नरके मला भेटले. त्यावेळी ते खूप अशक्त दिसत होते. त्यावर आपल्या येथील डॉक्टरांकडे उपचार सुरू केले. आज आपल्यातून चळवळीच्या मागे कायम उभा राहणारे हरी नरके हे निघून गेले आहे, याचं मला कायम दुख राहील. त्या घटनेनंतर सोशल मीडियावर काही हरी नरके यांच्या उपचारा बाबत मेसेज व्हायरल झाले आहेत. ते मेसेज मला देखील हरी नरके यांनी केले होते. त्याच दरम्यान आपल्या येथील डॉक्टरांकडे हरी नरके यांच्यावर उपचार सुरू केले होते. ५० डॉक्टर त्यांना येऊन बघत होते आणि त्याला वर्ष झाले. त्यामुळे मी त्यावर जास्त बोलणार नाही. पण जामनगरमध्ये जाऊन २० किलो वजन घटले तिथेच मला शंका आली होती. अशी कुठली औषध दिले त्यांना की २० दिवसात २० किलो वजन कमी झाले," असा सवाल देखील यावेळी त्यांनी उपस्थित केला.

### देश विदेशात अभ्यासपूर्ण भाषणे

» "सावित्री बाई फुले यांचे जन्मगाव असलेले नायगाव येथे त्यांच्या अभ्यासपूर्ण मांडणीनुसार तत्कालिन दिसणाऱ्या घराची राज्य शासनाने बांधणी केली आहे. त्यांनी लिहिलेल्या विविध ग्रंथाचे आज हिंदी, इंग्रजी भाषेत अनुवाद झाले आहेत. देश विदेशात त्यांनी अतिशय अभ्यासपूर्ण त्यांनी भाषणे केली. त्यांच्या निधनाने महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना मानणाऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे," अशा शब्दात त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

# येरवडा कारागृहात पुन्हा मोबाइल

## कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मोबाइल सापडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने येरवडा कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी चार कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




येरवडा मध्यवर्ती कारागृहाची सुरक्षा भेदून कैद्यांकडून मोबाइलचा वापर करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. कारागृहात पुन्हा कैद्यांकडे दोन मोबाइल संच, सीमकार्ड आढळून आले आहे. मोबाइल सापडण्याच्या घटना सातत्याने घडत असल्याने येरवडा कारागृहाच्या सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी चार कैद्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तालीम आस मोहमद खान ,राजू तुकाराम अस्वले, सचिन उर्फ पप्पू दत्तात्रय घोलप, आकाश उत्तम रणदिवे अशी गुन्हा दाखल केलेल्या कैद्यांची नावे आहेत. याबाबत कारागृह अधिकारी रेवणनाथ कानडे (वय ५४) यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### यापूर्वी सापडले होते मोबाइल संच

» अधिकाऱ्यांनी बराकीतील राजू अस्वले, सचिन घोलप, आकाश रणदिवे यांचीही झडती घेतली. तेव्हा अस्वलेकडे मोबाइल संच, बॅटरी, सीमकार्ड मिळाले. येरवडा कारागृहात यापूर्वी मोबाइल संच सापडले होते. किरकोळ वादातून कैद्यांमध्ये हाणामारी झाल्याच्या घटना घडल्या होत्या. या घटनेची गंभीर दखल घेऊन कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता यांनी तत्कालीन अधीक्षक राणी भोसले यांची ठाणे कारागृहात बदली केली होती.

# भीमाशंकर मंदिरात मोबाइल वापरास बंदी

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

बारा ज्योर्तिलिंगांपैकी पुणे जिल्ह्यातील एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथे सध्या भाविकांची मोठी गर्दी होत आहे. अधिक श्रावण महिना सुरू असल्यामुळे ही गर्दी होत आहे. त्यानंतर सुरू होणाऱ्या श्रावणात ही गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मंदिर परिसरात मोबाइल वापराला बंदी घालण्यात आली आहे. श्रावणात सुरक्षिततेच्या दृष्टीने गाभारा, मुख्य मंडप आणि मंदिर परिसरामध्ये गर्दी होऊन भाविकांची गैरसोय होऊ नये, दर्शन सुलभतेने व्हावे, तसेच कुठलीही अनुचित घटना घडू नये आणि मंदिराचे पावित्र राखले जावे यासाठी मोबाइल वापरास, बंदी करण्यात आली आहे. भाविकांनी गाभारा, मुख्य मंडप आणि मंदिर परिसरात छायाचित्रे काढू नयेत, तसेच मोबाइल बंद ठेवून सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे. या आवाहनानंतरही मंदिर परिसरात मोबाइल वापरताना किंवा छायाचित्र काढताना आढळल्यास मंदिर संस्थानाकडून दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

# चिखली, तळवडेची 'कोंडी' सुटणार!

## आमदार लांडगे यांच्या सूचनेची अंमलबजावणी

### रस्त्यांच्या कामांसाठी सल्लागार नियुक्तीला देण्यात आली मंजुरी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका हद्दीतील टाळगाव चिखली आणि तळवडे परिसरातील अंतर्गत रस्त्यांच्या कामांना आता गती मिळणार आहे. त्यामुळे समाविष्ट गावातील मोठ्या परिसरातील दळणवळण सक्षम होणार असून, स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे. या दोन्ही गावांची वाटचाल 'ट्रॅफिकमुक्ती'च्या दिशेने होणार आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिका स्थायी समिती सभेत टाळगाव चिखली आणि तळवडे भागातील अंतर्गत रस्तयांच्या कामांसाठी सल्लागार नियुक्तीला मंजुरी देण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह होते. सन १९९९ साली टाळगाव चिखली आणि तळवडे गावचा समावेश झाला. मात्र, अद्यापही अंतर्गत रस्त्यांचा दर्जा निकृष्ठ आहे. त्यामुळे वाढती लोकसंख्या आणि रहदारी याचा विचार करुन तात्काळ रस्त्याची कामे मार्गी लावावीत, अशी सूचना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली होती. त्याची प्रशासनाने अंमलबजावणी सुरू केली आहे.

शहरात चिखली-मोशी-चऱ्होली असा सर्वात मोठा 'रेसिडेन्सिअल कॉरिडॉर' विकसित होत आहे. चिखली गावाला ऐतिहासिक वारसा आहे. राज्यातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना अध्यात्म आणि वारकरी संप्रदायाचे शिक्षण उपलब्ध व्हावे, यासाठी राज्यातील पहिले जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ टाळगाव चिखली येथे सुरू झाले आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यातून या ठिकाणी अध्यात्म आणि वारकरी सांप्रदयातील व्यक्ती चिखलीला भेट देतात.

तळवडेत आयटी पार्क आणि औद्योगिक पट्टा असल्यामुळे मोठ्या प्रमाणात रहदारी असते. तसेच, श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदीला जोडणारा रस्ता चिखलीतून जातो. चाकण औद्योगिक पट्यातून ये-जा करणारे कामगार, कष्टकरी, तळवडे एकआयडी, जाधववाडी भागातील व्यावसिक पट्टा या भागातून मोठ्या प्रमाणात चिखलीतून रहदारी होत असते. त्यामुळे रस्त्यांची कामे पूर्ण करावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली होती.

> महापालिका विकास आराखड्यानुसार (DP) रस्त्यांच्या विकासाची कामे हाती घेण्यात यावी. त्यामुळे समाविष्ट गावांतील नव्याने वास्तव्यास आलेल्या नागरिकांना पायाभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. शहरात समातोल विकासाचे सूत्र प्रभावीपणे राबवायचे असेल, तर प्रशासनाने सकारात्मक कार्यवाही करावी आणि रस्त्यांची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी सूचना केली होती. त्याला प्रतिसाद देत रस्त्यांची कामे हाती घेण्यात येत आहेत. लवकर याबाबत निविदा प्रक्रिया राबवून कामाला सुरूवात करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

#### या रस्त्यांना मिळणार गती

महापालिका प्रशासनाकडून पहिल्या टप्प्यात १) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय ते संतपिठकडे जाणारा 18 मीटर रुंद डीपी रस्ता व इतर डीपी रस्ते विकसित करणे. २) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील साने चौक ते चिखली चौक रस्ता मंजूर विकास आराखड्यानुसार विकसित करणे. ३) प्रभाग क्रमांक १ चिखली मधील देहू आळंदी ते सोनवणे वस्ती कडे जाणारा ३० मीटर रुंद डीपी रस्ता विकसित करणे. ४) चिखली चौक ते सोनवणेवस्तीकडे जाणारा २४ मी. रुंद रस्ता विकसित करणे. ५) प्रभाग क्रमांक 12 मधील त्रिवेणी नगर चौक ते तळवडे चौकापर्यंत 24 मीटर रस्ता विकसित करणे. ६) प्रभाग क्रमांक 12 मधील तळवडे कॅनबे चौक ते भक्ती शक्ती चौकापर्यंत देहूरोड कॅन्टोन्मेंट हद्दीतून जाणारा उर्वरित २४ मीटर रस्ता विकसित करणे. ७) प्रभाग क्रमांक 12 मधील नदीच्या कडेने जाणारा मंजूर विकास योजनेतील रस्ता विकसित करणे १२ मीटर रुंद आदी रस्त्यांच्या कामांना गदी देण्यात येणार आहे. त्यामुळे चिखली आणि तळवडे परिसरातील अंतर्गत रस्ते विकसित करुन शहराच्या मुख्य रस्त्यांना जोडल्यास 'कनेक्टिव्हीटी' वाढणार आहे.

---

# क्रांतिकारकांचे बलिदान उजागर होणार!

## शंकर जगताप : "आझादी का अमृत महोत्सवानिमित्त" शहरात विविध उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त क्रांतिकारकांच्या बलिदानाचे उजागर करण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती पिंपरी-चिंचवड शहर भाजपा शहराध्यक्ष शंकर भाऊ जगताप यांनी दिली आहे.भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. जगत प्रकाश नड्डा यांच्या आदेशानुसार ०९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या दरम्यान "आझादी का अमृत महोत्सव समापण अभियान कार्यक्रम" संपूर्ण पिंपरी चिंचवड शहर राबविला जाणार आहे.**



या कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत भाजपा पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष मा. शंकर भाऊ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली चिंचवड किवळे मंडलाची बैठक उपमहापौर सचिन चिंचवडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात पार पडली. या बैठकीमध्ये, "हर घर तिरंगा", "विभाजन विभिषिका दिन" आणि "मेरी माती मेरा देश" या कार्यक्रमासाठी प्रभाग निहाय संयोजक यांची नेमणूक करून कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली. यामध्ये, प्रभाग सदस्य बिभीषण चौधरी यांची ("हर घर तिरंगा"), नगरसेवक राजेंद्र गावडे (मेरी माती मेरा देश), पूर्व उपमहापौर सचिन दादा चिंचवडे (विभाजन विभिषीका दिन) यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी, भाजपा चिंचवड विधानसभा प्रमुख काळूराम बारणे, सत्तारूढ पक्षनेता नामदेवराव ढाके, उपमहापौर सचिन (दादा) चिंचवडे, महिला मोर्चा शहराध्यक्ष उज्वलाताई गावडे, भायुमो प्रदेश सचिव अजित कुलते, चिंचवड किवळे मंडलाध्यक्ष योगेश चिंचवडे, चिंचवड किवळे महिला मोर्चा मंडलाध्यक्ष पल्लवीताई वाल्हेकर, ब प्रभाग अध्यक्ष सुरेश भोईर, नगरसेवक राजेंद्र गावडे, अभिषेक बारणे आदी पदाधिकारी - कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. प्रसंगी, विभाजन विभिषिका दिन, हर घर तिरंगा, "मेरी माती मेरा देश" या उपक्रमासाठी प्रभाग निहाय संयोजकांची नेमणूक करण्यात आली.

दि. 13 ते 15 ऑगस्ट या कालावधीत "हर घर तिरंगा" हे अभियान शहरातील सर्व प्रभागांमध्ये आणि सर्व बूथ वर घरोघरी राबविले जाणार आहे. सामान्य नागरिकांना सुद्धा या अभियानात सहभागी करून घेतले जाणार आहे. 12 ऑगस्ट रोजी शिवाजी चौक वाल्हेकरवाडी ते चिंतामणी गणपती मंदिर असा क्रांतिकारकांचा जिवंत देखावा मिरवणूक काढण्यात येणार आहे.


> स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त शहरातील प्रत्येक मंडलातील शाळा महाविद्यालय या स्वतंत्र सेनानी व फाळणीतिल कटू आठवणी यांच्या प्रदर्शनी लावल्या जाणार आहेत. अश्या पद्धतीने हा संपूर्ण कार्यक्रम ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या दरम्यान भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने राबविला जाणार आहे.
>
> **- शंकर जगताप,** भाजपा, पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष




# पश्चिम घाट अहवाल अव्यवहार्य!

**धरणे मोडीत काढणे, रासायनिक खतांचा वापर पूर्णपणे थांबवणे शक्य आणि व्यवहार्य आहे का, पश्चिम घाट अहवालाची काटेकोर अंमलबजावणी केली तरी दरड कोसळण्याच्या घटना थांबण्याची शाश्वती आहे का, याची मीमांसा..**

इरशाळवाडीसारखी दुर्घटना घडली की पश्चिम घाट पर्यावरण अहवाल चर्चेत येतो. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने मार्च २०१० मध्ये डॉ. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली पश्चिम घाट पर्यावरणतज्ज्ञ पॅनलची स्थापना केली. पॅनलने ३१ ऑगस्ट २०११ रोजी अहवाल सादर केला, पण पर्यावरण मंत्रालयाने तो ताबडतोब नाकारला. पर्यावरण मंत्रालयाने स्वत:च स्थापन केलेल्या समितीने दिलेला पर्यावरणस्नेही अहवाल मंत्रालयाने स्वत:च नाकारण्याची ही पहिलीच वेळ असावी.



गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ आणि तमिळनाडू या पश्चिम घाटात येणाऱ्या सर्व सहा राज्यांत आणि विशेषकरून केरळमध्ये, या अहवालाविरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटली. राज्यांनी अहवाल नाकारला असे म्हणणे योग्य नाही, कारण पॅनलची नेमणूक केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने केली होती. त्या मंत्रालयाने अहवालाच्या अंमलबजावणीचे आदेश काढले असते, तरच राज्य सरकारला ते मान्य की अमान्य हा प्रश्न आला असता. पण अहवाल केंद्रीय पर्यावरण मंत्रालयानेच नाकारला. पश्चिम घाट म्हणजे सह्याद्री पर्वतश्रेणीचा पश्चिमेकडचा उतार आणि डोंगरमाथ्यानजीकचा पूर्वेकडील काही भाग (उदाहरणार्थ महाबळेश्वर). पण गाडगीळ पॅनलने पश्चिम घाटाच्या सीमा महाराष्ट्रात पूर्वेकडे अहमदनगरपर्यंत खेचल्या. म्हणजे पॅनलच्या सूचना एवढ्या व्यापक भागात लागू होणार होत्या. अहवालातील काही मोजक्या सूचनांचा आढावा घेऊ या.. उपयोगी आयुष्य संपलेले औष्णिक ऊर्जा प्रकल्प आणि धरणे टप्प्याने मोडीत काढण्याची सूचना अहवालात आहे. धरणांचे उपयोगी आयुष्य पॅनलनेच ३० ते ५० वर्षे निश्चित केले आहे. मात्र प्रत्यक्षात धरण अभियांत्रिकीत धरणांचे 'उपयोगी आयुष्य अमुक एक वर्षे' अशी काही संकल्पनाच नाही. भारतातील अनेक धरणे ८० वर्षांपेक्षाही जुनी आहेत. केरळमधील मुल्ला पेरियार धरण तर १२५ वर्षे जुने आहे.

कावेरी नदीवरील मेट्टूर धरण ८८ वर्षे, कृष्णराज सागर धरण ९० वर्षे जुने आहे. धरणांचे उपयोगी आयुष्य फक्त ५० वर्षे असते, हा शोध पॅनलने कशाच्या आधारे लावला, याबाबत अहवालात स्पष्टता नाही. पॅनलमध्ये एकही धरण अभियांत्रिकीतज्ज्ञ नव्हता. महाराष्ट्रातील कोयना, मुळशी, वरसगांव, पानशेत, खडकवासला, भाटघर, भंडारधारा, जायकवाडी, मुळा, तानसा, तुळशी अशी अनेक मुख्य धरणे ५० वर्षांपेक्षा जास्त जुनी आहेत. ही धरणे शेतीला व शहरांना पाणीपुरवठा करतात. कोयना आणि मुळशी या दोन धरणांतून दोन हजार ६५३ मेगावॉट जलविद्युतनिर्मिती होते. ही धरणे मोडीत काढल्यास त्यावर अवलंबून असलेल्या शेतीला व पुणे, मुंबई या शहरांना पाणीपुरवठा कसा करायचा, याबाबत अहवालात एक शब्दही नाही.

एक सूचना अशीही आहे की, पश्चिम घाटात कुठेही एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यात पाणी वळविण्याची परवानगी नाही. कोयना आणि मुळशी हे दोन्ही प्रकल्प पूर्वेकडे वाहणाऱ्या कृष्णा खोऱ्याचे पाणी पश्चिमेकडे वळवतात. म्हणजे हे दोन्ही प्रकल्प ५० वर्षांपेक्षा जुने म्हणून तर बंद करावेच लागतील, शिवाय नदी-जोड प्रकल्प असल्यानेही ते ताबडतोब बंद करावे लागतील. धरण अभियांत्रिकी हा पर्यावरण मंत्रालयाचा विषयच नव्हे आणि म्हणून धरणे मोडीत काढण्यासंदर्भातील आदेश पर्यावरण मंत्रालय देऊच शकत नाही. पाणी हा विषय राज्यांच्या अखत्यारीत आहे, केंद्राच्या नाही व कोणतेही केंद्रीय मंत्रालय धरणे मोडीत काढा, असे आदेश राज्यांना देऊच शकत नाही. संपूर्ण पश्चिम घाटात रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके यांच्या वापरावर बंदी आणण्याची शिफारस या अहवालात आहे. आधीच दरहेक्टरी उत्पादनात आपण इतर देशांच्या खूपच मागे आहोत. जमिनीचे लहान तुकडे झाल्यामुळे रसायने वापरूनसुद्धा एक-दोन हेक्टर जमिनीतून एका शेतकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह होत नाही. त्यात भर म्हणून शेती रसायनांवर बंदी, म्हणजे उत्पादन अधिकच कमी. सेंद्रिय शेती ही कल्पना ऐकायला छान वाटली तरी त्यातून पुरेसे उत्पादन होत नाही, हे श्रीलंकेच्या उदाहरणातून स्पष्ट झाले आहेच. पॅनलमध्ये कोणीही कृषितज्ज्ञ नव्हता, शिवाय शेती हा पर्यावरण मंत्रालयाचा विषयच नव्हे.

## संपादकीय »

### उंडगे विरुद्ध दांडगे!

***लोकसभेत सत्ताधाऱ्यांस अन्यांच्या कुबड्यांची गरज नाही. त्यामुळे तेथे ते आधीच मंजूर झाले होते. आता राज्यसभेतही ते मंजूर झाल्याने त्याचा कायदा होईल.***

दिल्लीचे नियंत्रण संपूर्णपणे केंद्राच्या हाती देणारे विधेयक राज्यसभेतही मंजूर झाले यात काहीही आश्चर्य नाही. सध्या देशात फारच थोडे राजकीय पक्ष असे आहेत की जे केंद्राविरोधात भूमिका घेऊ इच्छितात आणि शकतात. बिजू जनता दल, तेलुगू देसम वा वायएसआर काँग्रेस हे काही अशा पक्षांतील नव्हेत. त्यामुळे त्यांनी या मुद्द्यावर राज्यसभेत केंद्राची तळी उचलणे ओघाने आले. त्यामुळे तेथे ते आधीच मंजूर झाले होते. आता राज्यसभेतही ते मंजूर झाल्याने त्याचा कायदा होईल. त्यामुळे राजधानी दिल्लीतून गवताची काडी जरी हलवायची झाली तरी त्याबाबतचा सर्वाधिकार केंद्रास मिळेल आणि दिल्लीवर राज्य करणारा पक्ष हा केंद्रातील पक्षाचा हुजऱ्या म्हणून काम करू लागेल. त्यामुळे हे विधेयक मंजूर झाल्यावर लोकशाहीची हत्या, संघराज्याचा गळा घोटला जाणार इत्यादी अपेक्षित प्रतिक्रिया आल्या.

**'डिजिटल वैयक्तिक विदा संरक्षण विधेयक – २०२३' (इंग्रजी आद्याक्षरांनुसार 'डीपीडीपी' विधेयक) लोकसभेत "चर्चेसाठी" मांडले जाणार असे सरकारने घोषित केल्यावर ते चर्चेविनाच मंजूर होणार हे जवळपास निश्चित होते आणि घडलेही तसेच. आता राज्यसभेत तरी याची पुनरावृत्ती होऊ नये.**

# 'लोकशाहीला घातक' कायदा

या विदा संरक्षण विधेयकाने 'कायदेशीर माहिती व्यवस्था स्थापन करण्या'ची वल्गना केली आहे, पण ही तथाकथित 'व्यवस्था' केंद्र सरकारच्या प्रचंड नियंत्रणाखाली असेल. मुळात हे विधेयक इतके अतिव्याप्त आहे की, खरोखरीची कायदेशीर व्यवस्था उभारण्यात ते अकार्यक्षमच ठरणार आणि म्हणून मग त्यास अभिप्रेत असलेली कारवाई हुकूमशाही नियंत्रणाखालीच राहून, सत्ताधाऱ्यांच्या वा अधिकाऱ्यांच्या मनमानीला मुक्तद्वार देणार. 'माहिती अधिकार कायद्या'ची मृत्युघंटा तर जाणीवपूर्वक आणि निर्लज्जपणे या विधेयकाने वाजवलेली आहेच, पण ते इतर कोणाच्याही माहितीशी संबंधित असलेल्या प्रत्येकाला 'विश्वासाश्रित' मानून, या तरतुदींच्या कोणत्याही उल्लंघनासाठी खटला चालवण्यास पात्र ठरवून टाकते. म्हणजेच, हे विधेयक मंजूर झाले तर प्रत्यक्षात आपल्यापैकी लाखो लोक त्याच्या तरतुदींचे सतत उल्लंघन करत



असतील. पण यापैकी कोणावर कारवाई करायची, हे ठरवण्याचा सर्वाधिकार केंद्र सरकारला किंवा केंद्र सरकार ठरवील त्या यंत्रणांना. वरवर पाहाता हेही साधे वाटेल- कुणी म्हणेल, 'सगळे कायदे असेच तर असतात'- पण लक्षात घ्या, विधेयकाचे सध्याचे स्वरूप पाहाता इथे फक्त आणि फक्त केंद्र सरकार ठरवेल की ते कसे चालवायचे, कधी आणि कोणाला लक्ष्य करायचे- म्हणूनच हे विधेयक पत्रकार, राजकारणी, संशोधक, कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि सतत भुणभुण करणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, अशा कोणाहीविरुद्ध सर्रास वापरता येईल यात आम्ही नकारात्मक असे काहीही सांगत नाही, हेच या विधेयकातील काही तरतुदींचे परीक्षण केल्यावर स्पष्ट होईल. विधेयक कोणाचे संरक्षण करते? 'विदासुरक्षेचे उल्लंघन' म्हणजे काय? त्या उल्लंघनावर कारवाई कशी होईल? कोणावर कारवाई होणार? अंतिम परिणाम काय होईल आणि त्याचा फायदा कोणाला होईल? या प्रश्नांच्या उत्तरांसाठी विधेयकातील काही महत्त्वाच्या तरतुदींची आपण छाननी करू या. पुढल्या 'कलम २ (यू)' अंतर्गत 'वैयक्तिक डेटाचे उल्लंघन' म्हणजे 'वैयक्तिक डेटाची कोणतीही अनधिकृत प्रक्रिया किंवा अपघाती प्रकटीकरण, संपादन, सामायिकीकरण, वापर, बदल, नाश किंवा वैयक्तिक डेटामध्ये प्रवेश गमावणे ज्यामुळे डेटाच्या गोपनीयतेशी किंवा वैयक्तिक डेटाच्या उपलब्धतेशी तडजोड होते'- हे सोप्या भाषेत सांगायचे तर, जोपर्यंत तुम्हाला समोरच्या व्यक्तीची स्पष्ट 'संमती' मिळत नाही, तोपर्यंत तुम्ही कोणत्याही प्रकारे डिजिटायझेशन केलेल्या कोणत्याही वैयक्तिक माहितीवर प्रक्रिया करू शकत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥

नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मदत मिळाली नाही तर सचिवाच्या दालनात 'साप' सोडू

## » शेतकऱ्यांसाठी विविध मागण्यासाठी बच्चू कडूंचा एल्गार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख तथा आमदार बच्चू कडू यांनी आज अमरावतीत सरकारविरोधात एल्गार विरोध मोर्चा काढला. यावेळी त्यांनी सरकारविरोधात जोरदार भाषण केले. आमची युती कोणासोबत नाही झाली तरी चालेल पण आपली युती मजूर, शेतकऱ्यांसोबत करू, जास्तीत जास्त तीन महिने आम्ही प्रतीक्षा करतो, नाहीतर आम्ही लढायला तयार आहोत, असे बच्चू कडू म्हणाले.**



बच्चू कडू म्हणाले की, आज आम्ही फक्त निवेदन देणार आहोत, कारण सरकार आपलं आहे. माझा एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास आहे. कारण हा गरिबांचा माणूस आहे. त्याच विश्वासाने आम्ही आज परत जात आहोत. यानंतर आम्ही तीन महिने वाट पाहू. तीन महिन्यात आमच्या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर आम्ही अधिक आक्रमक भूमिका घेऊ. साप चावल्यानंतर जर मजुराला पैसे मिळाले नाही तर पुढील पंधरा दिवसात मंत्रालयातील सचिवांच्या कार्यालयात साप सोडू असा इशारा बच्चू कडू यांनी दिला. प्रश्न सत्तेचा नाही. सत्तेत असणं म्हणजे खाली मान घालून वखर वाहने नाही. आम्ही मंत्री असताना दिल्लीत गेलो. आमच्यासाठी सत्ता महत्त्वाची नाही. आमच्यासाठी शेतकरी शेतमजूर महत्वाचा आहे, असं बच्चू कडू म्हणाले. शेतीची पेरणी ते कापणीपर्यंतची कामे रोजगार हमी योजनेतून व्हावीत, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना

### बळीराजाला दिलासा द्यायला हवा

» आमचा हा मोर्चा शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आहे. हा मोर्चा अमरावतीत असला तरीही अमरावतीतून सुरुवात होणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात प्रहार संघटना मोर्चा काढून आपला निषेध नोंदवणार आहे. आमच्या मागण्या सरकारने मान्य केल्या पाहिजे. बळीराजाला सरकारने दिलासा द्यायला हवा, असेही बच्चू कडू यांनी म्हटले आहे.

महात्मा फुले प्रोत्साहन अनुदान योजनेअंतर्गत 50 हजार रुपये अनुदान जाहीर करण्यात आले होते, पणअजूनही शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे तो तत्काळ मिळावा, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरीत नुकसानभरपाई मिळावी, वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, जीवितहानी यासाठी नुकसानभरपाई मिळावी, वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा, प्रकल्पग्रस्तांना २५ लाख रुपये अनुदान दिलं जावं, 20 लाख रुपये बिनव्याजी कर्ज अथवा कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, कंत्राटी कामगारांसाठी महामंडळ स्थापन करावे यासह विविध मागण्यांसाठी हा एल्गार मोर्चा काढण्यात आल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा देणाऱ्या आमदार बच्चू कडू यांनी सत्ताधाऱ्यांविरोधातच एल्गार मोर्चा काढला आहे. शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी हे आंदोलन पुकारले असून या पुढील काळात प्रत्येक जिल्ह्यात अशा प्रकारचे मोर्चे काढणार असल्याचे बच्चू कडू यांनी जाहिर केले.

# गौतम अदाणींसाठी मणिपूरमध्ये हिंसाचार

## » प्रकाश आंबेडकरांचा मोदी सरकारवर गंभीर आरोप

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काही दिवसांपूर्वीच दोन महिलांना निर्वस्त्र करून त्यांची धिंड काढल्याचा प्रकार मणिपूरमध्ये उघडकीस आला. या घटनेचा व्हिडिओही सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर देशभर संताप व्यक्त केला जात आहे. या संपूर्ण घटनेवर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी मोदी सरकारवर गंभीर आरोप केला आहे.**



अदाणी उद्योग समूहाचे प्रमुख गौतम अदाणी यांच्यासाठी मणिपूरमध्ये हिंसाचार घडवला जात आहे, असा खळबळजनक आरोप प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.
मणिपूर हिंसाचारावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मणिपूरमधील हिंसाचार गौतम अदाणींसाठी घडवला जातोय, असा माझा आरोप आहे. मणिपूरमधील खनिजांवर आदिवासींचा ताबा आहे. मागील सहा महिन्यात मैतेई समुदायाने आरक्षणाची मागणी केली, अशी एकही बातमी समोर आली नव्हती. कुठल्याच वर्तमानपत्रात अशी बातमी वाचली नाही. मग केंद्र सरकारने अचानकपणे मैतेई समुदायाला आदिवासी म्हणून आरक्षण देण्याचं का घोषित केलं? संविधानातील सहाव्या परिशिष्टानुसार, आदिवासी समुदाय वास्तव्यास असलेल्या प्रदेशात 'आदिवासी काऊन्सिल' असतात. त्या परिसरात काहीही करायचे असेल तर आदिवासी काऊन्सिलची परवानगी आवश्यक असते. असे असताना मोदी सरकारने मणिपूरमधील खाणी अदाणींना किंवा इतर

### काही महिन्यांपासून मणिपूर पेटले

» गेल्या तीन महिन्यांपासून भारताच्या ईशान्यकडील राज्य मणिपूमध्ये जातीय हिंसाचार उफाळला आहे. दररोज हिंसाचाराच्या नवनवीन घटना समोर येऊ लागल्या आहेत. यावरून संसदेत देखील विरोधकांकडून मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला जात आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील अविश्वास प्रस्तावावरील दुसऱ्या दिवसाच्या चर्चेला राहुल गांधींच्या भाषणाने सुरुवात झाली आहे. भाजपच्या मित्रांनी आज घाबरू नये. मी आज अदानीवर बोलणार नाही, असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी चिमटा काढला. तसेच आज मैं दिमाग से नहीं, दिल से बोलना चाहता हूँ, म्हणत सत्ताधाऱ्यांना टोमणे हाणले.

उद्योग समूहाला दिल्या आहे. पण आदिवासी काउन्सिल हे मान्य करत नाही. संसदेत देखील विरोधकांकडून मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला जात आहे. त्यामुळे त्यांनी हिंसाचार घडवला, अशी परिस्थिती आहे. यावर मोदींनी बोलायला पाहिजे, अशी मागणीही आंबेडकरांनी केली.

# राज्यातील हिंसाचार लज्जास्पद

## मणिपूरला जाऊन राहुल गांधींचे नाटक : अमित शहा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या पावसाळी अधिवेशनात अविश्वास प्रस्तावावरील दुसऱ्या दिवसाच्या चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा यांनी मणिपूरवर भाष्य केले. ते म्हणाले- राहुल गांधी मणिपूरला गेले होते. ते म्हणाले की, मला चुरचंदपूरला जायचे आहे. सेना म्हणाली - हेलिकॉप्टरने जा. त्यांनी मान्य केले नाही आणि तीन तास ऑनलाईन येवून त्यांनी नाटक केले आणि पुन्हा माघारी फिरले. तर दुसऱ्या दिवशी पुन्हा हेलिकॉप्टरने गेले. पहिल्या दिवशीच ते हेलिकॉप्टरने त्या ठिकाणी जाऊ शकले असते. पण त्यांना राजकारण करायचे होते.**



### विरोधकांना चांगले घेरले, सडकून टीका केली

» अमित शहा यांनी लोकसभेत विरोधकांना चांगलेच घेरले. अविश्वास ठरावावर बोलताना त्यांनी विरोधकांवर सडकून टीका केली. विरोधकांनी किमान सरकारच्या विरोधात काही मुद्दे चर्चेत ठेवले असते, असे ते म्हणाले. अल्पसंख्याकांचा मुद्दाच नाही. देशातील 60 कोटी गरीब जनतेला नवी आशा कोणी दिली असेल तर ती मोदी सरकारने दिली आहे. मी देशभर फिरतो, लोकांमध्ये जातो. अनेक ठिकाणांहून जनतेशी संवाद साधला. कुठेही अविश्वासाची धुसर शक्यताही नाही.

### PM मोदी 17 तास काम करतात

» मणिपूरमध्ये 3 मे पासून कुकी आणि मेईतेई समुदायांमधील हिंसाचारात आतापर्यंत 131 लोकांचा मृत्यू झाला आहे. तर 419 जण जखमी झाले आहेत. 65,000 हून अधिक लोकांनी आपली घरे सोडली आहेत. जाळपोळीच्या 5 हजारांहून अधिक घटना घडल्या आहेत. 6 हजार गुन्हे दाखल झाले आहेत. एकही रजा न घेता 24 तासांपैकी 17 तास जास्तीत जास्त काम करणारा स्वातंत्र्यानंतर कोणता पंतप्रधान असेल तर ते नरेंद्र मोदी आहेत. स्वातंत्र्यानंतर जास्तीत जास्त किलोमीटर आणि जास्तीत जास्त दिवसांचा प्रवास करणारा कोणी पंतप्रधान असतील तर ते नरेंद्र मोदीच आहेत. सरकार वर्षानुवर्षे चालते तेव्हा दोन-चारच निर्णय घेतले जातात, जे युगानुयुगे स्मरणात राहतात. मोदी सरकारच्या 9 वर्षांत असे किमान 50 निर्णय झाले आहेत जे युगप्रवर्तक आहेत. गांधीजींनी ब्रिटिशांना भारत छोडो असा नारा दिला होता. साडेनऊ वर्षांत मोदीजींनी एका नव्या प्रकारचे राजकीय युग सुरू केले. तीस वर्षे राजकारण भ्रष्टाचार, घराणेशाही, तुष्टीकरणाच्या नाशाने ग्रासले होते. मोदीजींनी पॉलिटिक्स ऑफ परफॉर्मन्स पसंत केले. पण तरीही भ्रष्टाचार दूरवर बसला आहे, कुटुंबवाद दिसतोय आणि तुष्टीकरणाचे राजकारण दिसत आहे. म्हणूनच मोदीजींनी आज तिघांनाही भारत सोडण्याचा नारा दिला आहे.

मी तिथे तीन दिवस आणि तीन रात्री राहिलो. माझा सोबती नित्यानंद 23 दिवस राहिला. चौकशीसाठी आम्ही उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांची समिती स्थापन केली आहे. त्यात आयपीएस यांचा देखील समावेश आहे. आजही मीतेई आणि कुकीचा राग शांत झालेला नाही, पण आम्ही फौजफाटा तैनात केला आहे, त्यामुळे शांतता आहे. मणिपूरमध्ये जे घडले ते लज्जास्पद आहे. त्यावर राजकारण करणे हे त्याहूनही लाजिरवाणे आहे. नरसिंह राव पंतप्रधान असताना मणिपूरमध्ये 700 लोक मारले गेले, पण तिथे पंतप्रधान गेले नाहीत. गृहमंत्री अमित शहा म्हणाले- आम्हाला मणिपूरवर चर्चा नको आहे, असे बोलले जात आहे, परंतु सभागृह सुरू होण्यापूर्वी आम्ही त्यावर चर्चा करण्यासाठी सभापतींना पत्र लिहिले होते. विरोधकांना चर्चा नको, विरोध करायचा आहे. मणिपूरसारख्या विषयावर तुम्ही गृहमंत्र्यांना बोलू देत नाही. तुम्ही आम्हाला गप्प करू शकत नाही, तुम्हाला आम्हाला ऐकावे लागेल. 2021 मध्ये म्यानमारमध्ये सत्ताबदल. तेथे लष्करी सरकार पडले. तिथे कुकी लोकशाही आघाडीने आंदोलन करून लष्करी सरकारवर दबाव निर्माण केला. हजारो कुकी आदिवासी मणिपूरच्या जंगलात स्थायिक होऊ लागले. सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही मुक्त सीमा बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. 10 किलोमीटर कुंपण घालण्यात आले आहे. सात किमीचे काम सुरू आहे. पीव्ही नरसिंह राव 1993 मध्ये पंतप्रधान होते. मणिपूरमध्ये काँग्रेसचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी नागा-कुकी संघर्ष झाला होता. 700 लोक मरण पावले. त्यानंतरही पंतप्रधान तेथे गेले नाहीत. मला नाव सांगायचे नाही. गृहमंत्रालयाच्या नोंदींमध्ये कोणाचा समावेश आहे. 2004 मध्ये मनमोहन सिंग यांचे सरकार होते, तेव्हा 1700 हून अधिक लोकांचे एन्काउंटर झाले होते. मणिपूरमध्ये जे घडले ते वांशिक हिंसाचार आहे. यावर राजकारण होता कामा नये. रात्री फोन करून मोदीजींनी मला उठवले. आम्ही अनेक व्हिडिओ कॉन्फरन्सिंग केले.

---

# कलम 370 वर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

## ही व्यवस्था जम्मू-काश्मीर-भारत यांच्यातील करार : सुब्रमण्यम

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवण्याच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या 23 याचिकांवरील सुनावणी बुधवारी 9 ऑगस्ट रोजी चौथ्या दिवशी सुप्रीम कोर्टात झाली. याचिकाकर्ते मुज्जादार इक्बाल खान यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील गोपाल सुब्रमण्यम यांनी सकाळी युक्तिवाद सुरू केला. पुढे ज्येष्ठ वकील जफर शाह यांनी तो सुरू ठेवला.**



### मंगळवारी 5 तास 18 मिनिटे सुनावणी

» 8 ऑगस्ट रोजी झालेल्या सुनावणीत सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड म्हणाले की, कलम 370 स्वतःच म्हणते की ते रद्द केले जाऊ शकते. त्यावर उत्तर देताना सिब्बल म्हणाले होते, तुम्ही 370 मध्ये बदल करू शकत नाही, ते काढून टाकायचे तर सोडाच. CJI म्हणाले- तुमचे म्हणणे बरोबर आहे, त्यामुळे सरकारला स्वतः 370 बदलण्याचा अधिकार नाही. सिब्बल म्हणाले- हे इंटरप्रिटेशन क्लॉज आहे, हे संविधान दुरुस्तीचे कलम नाही.

दुपारी 4.50 पर्यंत (एकूण 4 तास 40 मिनिटे) सुनावणी चालली. त्यापूर्वी 8, 3 आणि 2 ऑगस्ट या तीन दिवशी वकील कपिल सिब्बल यांनी युक्तिवाद केला. सुब्रमण्यम म्हणाले की, विलिनीकरणाच्या वेळी जम्मू-काश्मीर इतर राज्यांसारखे नव्हते. त्याचे स्वतःचे संविधान होते. आपली राज्यघटना विधानसभा आणि संविधान सभा या दोन्हींना मान्यता देते. दोन्हीच्या संविधानातून मूळ रचना काढली जाईल. डॉ.आंबेडकरांनी राज्यघटनेतील संघराज्य आणि राज्यांना विशेष अधिकार याविषयी सांगितले होते. ते म्हणाले की, राष्ट्रपतींकडे अनियंत्रित अधिकार नसतात. कलम 370 च्या क्लॉज 1 मधील अधिकाराचा उद्देश परस्पर समंजसपणावर आधारित आहे.

ही व्यवस्था जम्मू-काश्मीर आणि भारत यांच्यातील संघराज्याची तडजोड होती. संघराज्य हा एक वेगळ्या प्रकारचा सामाजिक करार आहे. 370 हे या नात्याचे फक्त एक उदाहरण आहे. हे संघराज्य तत्त्व केवळ कलम 370 अंतर्गत वाचले पाहिजे. ते रद्द करता येणार नाही. कलम 370 हे संविधानाच्या तरतुदींचा वापर आहे. सुब्रमण्यम यांनी विचारले की, जम्मू-काश्मीर संविधान सभेला राज्यघटना तयार करण्याचे काम सोपविण्यात आले नाही का? यावर CJI म्हणाले की, 1957 नंतर, जम्मू आणि काश्मीरच्या विधानसभेने किंवा देशाच्या संसदेने जम्मू आणि काश्मीर राज्याला भारतीय संविधानाच्या कक्षेत स्पष्टपणे आणण्यासाठी भारतीय संविधानात सुधारणा करण्याचा कधीही विचार केला नाही. यावर सुब्रमण्यम म्हणाले की, जम्मू-काश्मीरचे संविधान जम्मू-काश्मीरसाठी आहे.

# अंकिता -विकी केलं लग्न



पवित्र रिश्ता फेम अभिनेत्री अंकिता लोखंडेने तिचा पती विकी जैनसोबत दुसऱ्यांदा लग्न केले आहे. अंकिताने तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर लग्नाचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. व्हिडिओ शेअर करताना अंकिताने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'पुन्हा लग्न केले.' व्हिडिओमध्ये दोघेही परदेशात ख्रिश्चन रीतीरिवाजांनुसार लग्न करत आहेत. दोघांनी एकमेकांना अंगठी घातली. यादरम्यान अंकिता गुलाबी साडीमध्ये खूपच सुंदर दिसत आहे. तिने पोनी टेल बांधला आणि जड नेकपीसने लूक पूर्ण केला. तर विकी पांढऱ्या सूटमध्ये डॅशिंग दिसत आहे. या व्हिडिओला सोशल मीडियावर खूप पसंती दिली जात आहे. अंकिता लोखंडेने 14 डिसेंबर 2021 रोजी विकी जैनसोबत लग्न केले. त्यांच्या लग्नाचे काही फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. अंकिता आणि विकीने 2018 मध्ये एकमेकांना डेट करायला सुरुवात केली होती. विकी हा व्यवसायाने व्यापारी आहे.

# नीनाजींच्या लूकपुढे दीपिकाही फिकी!

बॉलीवूडची सुपरहॉट अभिनेत्री नीना गुप्ता हे नाव मनोरंजन विश्वातलं कायम चर्चेतलं आणि तितकचं लोकप्रिय नाव आहे. नीना या नेहमी चर्चेत असतात. मग ते वैयक्तिक कारणामुळे असो किंवा त्याच्या व्यावसायिक कारणाने. नीना यांच्या वक्तव्याची ही बरीच चर्चा होत असते. काही दिवसांपुर्वी नीना यांचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला होता. त्या परदेशी फिरायला गेल्या होत्या. पती विवेक मेहरासोबत फ्रान्समध्ये सुट्टीचा आनंद घेत होते. नीना गुप्ता त्यांच्या ग्लॅमरस अवतारामुळे लाईमलाईटमध्ये राहतात. यावेळीही तसचं काहीतरी झालं. सध्या सोशल मिडियावर त्यांचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत आहे. या व्हिडिओत त्यांनी शॉर्ट्स आणि हाय बूट घालून लूक पुर्ण केला आहे. त्याच्या या लूकची सोशल मीडियावर खुपच चर्चा आहे. पापाराझींनी त्यांचा हा व्हिडिओ शेयर केला आहे. व्हिडिओमध्ये नीना काळ्या रंगाच्या मिनी ड्रेसमध्ये आणि उंच बूट आणि मॅचिंग पर्सही घेतली होती. साधा ब्राऊन शेड्सने त्यांनी त्यांचा स्टायलिश लुक कॅरी केला. नीना नुकत्याच 'लस्ट स्टोरीज' आणि 'ट्रायल पिरीएड' मुळे चर्चेत होत्या. 'ट्रायल पिरीएड' या वेब सिरिजची सक्सेस पार्टी झाली त्यासाठी नीना आल्या होत्या. नीना वयाच्या ६४ व्या वर्षीही इतक्या फिट आहेत. वयाच्या 64 व्या वर्षी नीना यांनी केवळ त्यांच्या वयातील लोकांनाच नाही त्या तरुण चाहत्यांनाही आयुष्य आनंदाने आणि धैर्याने जगण्यासाठी प्रेरणा देतात लोक नीनांच्या लूकचे कौतुक करत आहेत.

# शिल्पाचा व्हॉट झुमका

शिल्पा शेट्टीने तिचा एक डान्स व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे, ज्यामध्ये ती रॉकी आणि राणीच्या प्रेमकथेतील 'व्हॉट झुमका' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. करण जोहरच्या या चित्रपटात रणवीर सिंह आणि आलिया भट्ट मुख्य भूमिकेत आहेत. शिल्पाच्या या व्हिडिओमध्ये ती गुलाबी सलवार सूटमध्ये दिसत आहे. यासोबत तिने सोनेरी आणि गुलाबी रंगाचा झुमका आणि सोनेरी बांगड्या घातल्या आहेत, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत आहे. शिल्पाने हा व्हिडिओ चित्रपटाचा दिग्दर्शक करण जोहरला समर्पित केला आहे. व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्रीने कॅप्शनमध्ये लिहिले की, 'हे तुमच्यासाठी आहे करण जोहर. जब आप #झुमका पहन रहे हों, तब तो जरूर बनता है ठुमका। हालांकि, @MANISHMALHOTRA05 की साड़ी याद आ रही है' शिल्पाचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर खूप पसंत केला जात आहे. व्हिडिओवर कमेंट करताना एका यूजरने लिहिले की, 'सुपरर से भी ऊपर'. दुसर्‍याने लिहिले, 'परफेक्ट'. तिसर्‍या यूजरने शिल्पाचे कौतुक करत लिहिले, 'तू खूप सुंदर दिसत आहेस. शिल्पा शेट्टी लवकरच रोहित शेट्टीच्या इंडियन पोलिस फोर्स या वेबसिरीजमध्ये ॲक्शन अवतारात दिसणार आहे. या वेब सीरिजमध्ये त्याच्यासोबत सिद्धार्थ मल्होत्रा आणि विवेक ओबेरॉय हे देखील मुख्य भूमिकेत आहेत. याशिवाय शिल्पाने 'केडी - द डेव्हिल' देखील साइन केले आहे, ज्यामध्ये ती सत्यवतीची भूमिका साकारणार आहे. या चित्रपटात ध्रुव सर्जा, शिल्पा शेट्टी, व्ही रविचंद्रन आणि संजय दत्त यांच्याही भूमिका आहेत.



# रणवीर आईच्या पाया पडला

फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा यांनी काल रात्री मुंबईत एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रणवीर सिंग आणि आलिया भट्ट 'द ब्राइडल कॉचर' शोमध्ये शोस्टॉपर बनले. रणवीरची पत्नी आणि अभिनेत्री दीपिका पदुकोणही रणवीरची आई अंजू भवनानीसोबत शोमध्ये सहभागी झाली होती. यादरम्यान अभिनेता रॅम्प वॉकदरम्यान थांबला आणि त्याने पत्नी दीपिकाच्या जवळ जात तिच्या गालाचे चुंबन घेतले आणि आईच्या पाया पडत दर्शन घेतले. दीपिका, जान्हवी कपूर, खुशी कपूर, काजोल आणि करण जोहरसह अनेक दिग्गज कलाकार या कार्यक्रमाला उपस्थित होते. व्हिडिओमध्ये रणवीर सिंग शेरवानी आणि ग्लिटरिंग जॅकेटमध्ये रॅम्प वॉक करत होता. दरम्यान, तो अचानक थांबला आणि दीपिकाजवळ गेला आणि तिच्या गालावर किस केला. यानंतर रणवीर आईच्या पायाला स्पर्श करून आशीर्वाद घेताना दिसला. त्यानंतर त्याने पुन्हा रॅम्प वॉक सुरू केला. या व्हिडिओला सोशल मीडियावर खूप पसंती दिली जात आहे. व्हिडिओवर कमेंट करताना चाहत्यांनी रणवीरच्या या हावभावाचे कौतुक केले आहे.

# हाउसफुल रजनीकांत यांचा जेलर






10 ऑगस्ट रोजी सुपरस्टार रजनीकांत दोन वर्षांनी जेलर चित्रपटाद्वारे मोठ्या पडद्यावर परतत आहेत. दक्षिणेत उत्सवासारखे वातावरण आहे. ठिकठिकाणी रजनीकांत यांचे होर्डिंग्ज लावण्यात आले असून, त्यावर दुधाचा अभिषेक करण्यात येत आहे. आगाऊ बुकिंग 5 ऑगस्टपासून सुरू झाले आणि काही वेळातच 15 ऑगस्टपर्यंतचे सर्व शो तामिळनाडू, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमधील अनेक शहरांमध्ये बुक झाले ट्विटर आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ₹5,000 पर्यंत तिकिट ब्लॅकमध्ये विकले जात आहेत. यासाठी कोणतीही किंमत मोजायला चाहते तयार आहेत. तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये अनेक कंपन्यांनी सुट्टी जाहीर केली आहे. कर्मचार्‍यांना चित्रपटाची तिकिटेही दिली जात आहेत. रसिकांमध्ये फर्स्ट-डे, फर्स्ट शो अशी स्पर्धा सुरु आहे. एका चित्रपटगृहाच्या व्यवस्थापकावर चाहत्यांनी चित्रपटाचे तिकीट न मिळाल्याने हल्ला केला. व्यवस्थापक सध्या रुग्णालयात दाखल आहे. केवळ भारतातच नाही तर परदेशातही रजनीकांतच्या चित्रपटाची प्रचंड क्रेझ आहे. जेलर हा अमेरिकेतही सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट ठरेल असा अंदाज आहे. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, आतापर्यंत जेलरने ॲडव्हान्स बुकिंगमधून जगभरातून ₹ 122 कोटींहून अधिक कमाई केली आहे. रजनीकांत यांच्या चित्रपटाच्या जगभरातील क्रेझचा अंदाज यावरून लावता येतो की, गदर-2 आणि OMG-2 हे दोन मोठे बॉलीवूड चित्रपटही 11 ऑगस्टला प्रदर्शित होत आहेत, मात्र या दोन्ही चित्रपटांपेक्षा जेलरचे आगाऊ बुकिंग कितीतरी पटीने खूप जास्त आहे. रजनीकांतचा चित्रपट रिलीज होण्याआधी, त्यांचे चाहते ऑफिसमधून एक दिवस सुट्टी घेण्यासाठी अर्ज करू लागतात, जेणेकरून त्यांना फर्स्ट डे फर्स्ट शो पाहता येईल. हा ट्रेंड रजनीच्या याआधीच्या कबाली, काला आणि २.० या चित्रपटांमध्येही दिसून आला होता आणि आता हाच ट्रेंड जेलरसाठीही पाहायला मिळत आहे.

# भारताने उडविला पाकिस्तानचा धुवा

## » आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी ; हरमनप्रीतचा दुहेरी गोल

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय हॉकी संघाने आपली विजयाची मोहीम कायम ठेवली आहे. या संघाने स्पर्धेतील शेवटच्या साखळी सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा 4-0 ने पराभव केला. पाकिस्तानवर भारताचा हा 65 वा विजय आहे. या दोघांमध्ये आतापर्यंत 83 सामने खेळले गेले आहेत.**

चेन्नईच्या मेयर राधाकृष्णन स्टेडियमवर भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने दुहेरी गोल केले. त्याने 23व्या आणि 15व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरवरून गोल केले. जुगराज सिंग आणि आकाशदीप सिंग यांच्या स्टिकमधून प्रत्येकी एक गोल झाला. जुगराजने सामन्याच्या 36 व्या मिनिटाला पेनल्टीवर, तर आकाशदीप सिंगने 55 व्या मिनिटाला मैदानी गोल केला. भारतीय संघाने आक्रमक सुरुवात केली, सुरुवातीच्या मिनिटांत संघाची पेनल्टी हुकली असली तरी कृष्ण बहादूर पाठकने अप्रतिम बचाव केला. त्यानंतर ८व्या मिनिटाला रेफ्रींनी जुगराज सिंगला ग्रीन कार्ड दाखवले. क्वार्टरच्या शेवटच्या क्षणी भारताला पेनल्टी देण्यात आली आणि पाकिस्तानचा कर्णधार उमर भुट्टाला ग्रीन कार्ड दाखवण्यात आले.

या पेनल्टी कॉर्नरचा फायदा घेत भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने शानदार ड्रॅग फ्लिकसह गोल केला. दुसऱ्या क्वार्टरमध्ये पाकिस्तानने आक्रमक भूमिका ठेवली. पाकिस्तानने चेंडूवर




विजय मिळविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. भारतीय खेळाडूंनी संयम राखला आणि बचावात्मक खेळ करताना दोन मोठ्या संधी निर्माण केल्या. कॉर्नरचा फायदा घेत कर्णधार हरमनप्रीत सिंगने पुन्हा एकदा गोल करत 2-0 अशी आघाडी घेतली. दुसऱ्या गोलनंतर भारताने पुन्हा आक्रमक खेळ सुरू करत खेळावर ताबा मिळवला. डी मध्ये खेळाडूंनी 4 संधी निर्माण केल्या. यानंतर भारताने शेवटच्या

### कर्णधार हरमनप्रीत टॉप स्कोअरर

» भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी 2023 मध्ये आतापर्यंत पाच गोल केले आहेत आणि तो या स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे. पाकिस्तानच्या मोहम्मद खानने तीन गोल केले असून त्यांना रोखणे भक्रातसमोर आव्हान असेल.

क्षणी लांब पासेस देऊन खेळ केला. दुसऱ्या गोलनंतर पाकिस्तानला एकदाही भारताच्या बॉक्समध्ये प्रवेश करण्याची संधी मिळाली नाही. अखेरच्या मिनिटाला भारताला पेनल्टीची संधी मिळाली, पण गोल झाला नाही. तिसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीला कृष्ण पाठकने एक गोल वाचवला. गुरजंत सिंगने पेनल्टी कॉर्नर चेंडू जिंकून ३६व्या मिनिटाला भारताची आघाडी ३-० अशी वाढवली. भारताने 5 पेनल्टी कॉर्नरवर 3 गोल केले. आकाशदीप सिंगची 42 व्या गोलची सुवर्णसंधी हुकली. मागील सामन्यात गतविजेत्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी चॅम्पियन दक्षिण कोरियाचा 3-2 असा पराभव करून भारताने उपांत्य फेरीत आपले स्थान आधीच निश्चित केले आहे. भारतीय पुरुष हॉकी संघाने आपल्या मोहिमेची सुरुवात चीनविरुद्ध 7-2 असा आणि जपानविरुद्ध 1-1 अशी बरोबरी साधून केली. त्यांनी त्यांच्या तिसऱ्या सामन्यात मलेशियाचा 5-0 असा पराभव केला. या स्पर्धेत आतापर्यंत भारत हा एकमेव अपराजित संघ आहे.

# रोहित शर्मा चांगला कर्णधार

## » युवराज सिंगने केले रोहित शर्माचे कौतुक

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ सुरू होण्यास २ महिन्यांहून कमी कालावधी शिल्लक आहे. यंदाचा विश्वचषकाचे यजमानपद हे भारताला मिळाले असून ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये खेळवला जाणार आहे. विश्वचषकापूर्वी तज्ज्ञ आणि माजी क्रिकेटपटूंनी आपली मते मांडण्यास सुरुवात केली आहे. यात भारताचा माजी स्टार डावखुरा फलंदाज युवराज सिंगचाही सहभाग होता. २०११च्या विश्वचषकात भारतीय संघाचा भाग असलेल्या युवराजने भारताचा कर्णधार रोहित शर्माबद्दल बोलताना बीसीसीआयकडे अनोखी मागणी केली.**

'इंद्रनील बासू'शी बोलताना माजी खेळाडू युवराज सिंग म्हणाला की, "रोहित शर्मा चांगला कर्णधार आहे, पण तुम्हाला त्याला चांगली टीम द्यायची आहे."



### फुटबॉलमध्ये रेड कार्डचा अर्थ

» एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे सुधारित वेळापत्रक आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) गुरुवारी जाहीर केले आहे. यामध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सह नऊ सामन्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. विश्वचषकाची तिकिटे २५ ऑगस्टपासून विक्रीसाठी ठेवली जातील. ५ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर मागच्या विश्वचषकातील अंतिम फेरीतील इंग्लंड आणि न्यूझीलंडचे संघ एकमेकांशी भिडतील आणि स्पर्धेला सुरुवात होईल.

२०११मध्ये भारताला विश्वचषक जिंकून देणाऱ्या कर्णधाराबद्दल युवराज म्हणाला की, "एम.एस. धोनी हा देखील चांगला कर्णधार होता, पण त्याच्याकडे अनुभवी खेळाडूंसह एक चांगली टीमही होती. २०११च्या विश्वचषकात सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग, झहीर खान, हरभजन सिंग असे अनेक स्टार खेळाडू होते. पुढे युवी म्हणाला की, "मात्र, सध्या टीम इंडियाकडे मोहम्मद शमी, के.एल. राहुल आणि जसप्रीत बुमराहसारखे काही खेळाडू आहेत, जे २०१९च्या विश्वचषकात टीम इंडियाचा भाग होते.

याशिवाय संघात अनेक युवा खेळाडू आहेत ज्यांच्याकडे एकहाती सामना जिंकण्याची क्षमता आहे. भारतीय संघ जरी गेल्या काही काळापासून के.एल. राहुल, जसप्रीत बुमराह आणि श्रेयससारख्या खेळाडूंशिवाय खेळत असला तरी, हे खेळाडू दुखापतीमुळे संघाबाहेर आहेत. त्यामुळे जरी ते संघात जरी परतले तरी त्यांच्या फॉर्मवर प्रश्नचिन्ह कायम राहील.

जसप्रीत बुमराहचे संघात आयर्लंड दौऱ्यावर पुनरागमन झाले आहे मात्र, विश्वचषकापर्यंत इतर खेळाडूंच्या बाबतीत कुठलीच अधिकृत माहिती अद्याप मिळालेली नाही. विश्वचषकापर्यंत पुनरागमनाबद्दल या खेळाडूंची अटकळ बांधली जात आहे. रोहित शर्माच्या कर्णधारपदाचे कौतुक करताना युवराज पुढे म्हणाला, "मला वाटते की रोहित खूप चांगला कर्णधार बनला आहे कारण त्याने आयपीएलमध्ये दीर्घकाळ मुंबईचे कर्णधारपद भूषवले आहे. त्याच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने पाच ट्रॉफी जिंकल्या आहेत.

# 'ही' तारीख लक्षात ठेवलीच पाहिजे

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

एकदिवसीय विश्वचषक २०२३ चे सुधारित वेळापत्रक आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (ICC) गुरुवारी जाहीर केले आहे. यामध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सह नऊ सामन्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. विश्वचषकाची तिकिटे २५ ऑगस्टपासून विक्रीसाठी ठेवली जातील. ५ ऑक्टोबर रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर मागच्या विश्वचषकातील अंतिम फेरीतील इंग्लंड आणि न्यूझीलंडचे संघ एकमेकांशी भिडतील आणि स्पर्धेला सुरुवात होईल. ICCने पुढे घोषणा केली की चाहत्यांमध्ये गोंधळ टाळण्यासाठी भारताच्या सामन्यांसाठी टप्प्याटप्प्याने तिकिटांची विक्री केली जाईल. २५ ऑगस्ट रोजी, सर्व भारत सोडून इतर मुख्य सामने आणि सराव सामन्यांची तिकीटविक्री सुरू होईल. याचा अर्थ भारत वगळता इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि नेदरलँड या नऊ संघांच्या सर्व सामन्यांची तिकिटे २५ ऑगस्टपासून बुक करता येतील. ICCने तिकीट विक्री सामन्यांच्या ठिकाणांच्या आधारे विभाजित करण्याचा निर्णय घेतल्याने भारताच्या सामन्यांसाठी गोष्टी थोड्या अवघड होतात. भारताच्या सराव सामन्यांची तिकिटे ३० ऑगस्टपासून सुरू होतील. विशेष म्हणजे, भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याची तिकिटे आता ३ सप्टेंबर पासून मिळतील कारण सामन्याची तारीख ही १५ ऑक्टोबर ऐवजी १४ ऑक्टोबर करण्यात आली आहे. तिकिटांच्या घोषणांबद्दल नियमित माहिती मिळवण्यासाठी ICC ने चाहत्यांना त्यांच्या वेबसाइटवर नोंदणी करण्याचा सल्ला दिला आहे, ज्याची लिंक १५ ऑगस्टपासून सक्रिय होईल. तिकिटांची अपेक्षित मागणी व्यवस्थापित करण्यासाठी आणि शक्य तितक्या चाहत्यांना जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडूंना पाहण्याची सर्वोत्तम संधी देण्यासाठी, पुढील तारखांना तिकिटांची टप्प्याटप्प्याने विक्री केली जाईल.